# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक:१९६७, मुंबई :४०००० १.

दूरध्वनी- २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०,/५१ फॅक्स नं.२६९२१०२

तार- EDUTECH E_mail desk7@dte.org.in internet :- http://www.dte.org.in


अत्यंत तातडीचे

क्रमांक : ७/अनुदान/म.भत्ता/२००९/ ८८

दिनांक : २९ सितम्बर SEP 2009

प्रति,

संचालक/प्राचार्य,
अशासकीय अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये/तंत्रनिकेतने
व तत्सम पदवी/पदविका संस्था

१. कुलसचिव,
डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ,
लोणेरे, ता.माणगाव, जि.रायगड ४०२ १०३

२. प्राचार्य,
सर जे.जे.कॉलेज ऑफ आर्किटेक्चर,
मुंबई

**विषय** : दि. १ जानेवारी २००९ पासून वाढीव महागाई भत्ता लागू करण्याबाबत

संदर्भ : महाराष्ट्र शासन वित्त विभाग शासन निर्णय क्र :- मभवा-११०९/प्र.क्र.९६/वेपूक, दि.२१ जुलै २००९

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये राज्य शासकीय व इतर पात्र असणा-या व असुधारीत वेतन श्रेणीत वेतन घेणा-या कर्मचा-यांना दि.०१.०१.२००९ पासून वेतनश्रेणीतील मूळ वेतन अधिक महागाई वेतनावर अनुज्ञेय महागाई भत्त्याचा दर ५४ टक्के वरुन ६४ टक्के करण्यात आलेला आहे. म्हणजेच दि.०१.०१.०९ पासून १० टक्के एवढया अधिक दराने महागाई भत्त्यात वाढ केलेली आहे. (संदर्भाधीन शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घेण्यात यावा. त्याचा संकेतांक २००९०७२१८१८३४४७००९असा आहे.)

उपरोक्त शासन निर्णयाप्रमाणे सदर प्रकरणी वाढीव महागाई भत्त्याची रक्कम अशासकीय अनुदानित संस्थांनाही लागू असल्यामुळे सर्व संस्थाप्रमुखांनी आपल्या संस्थेतील कर्मचा-यांना शासनाच्या दि.२१ जुलै २००९ च्या शासन निर्णयान्वये वाढविण्यात आलेली १० टक्के महागाई भत्त्याची रक्कम अदा करावयाची असून, सदरची रक्कम वेळोवेळी मंजूर केलेल्या उपलब्ध अनुदानातून अदा करण्यात यावी. यासाठी वेगळे अनुदान दिले जाणार नाही. त्यामुळे सदरच्या खर्चाच्या रकमेसाठी अनुदानाची मागणी करण्यात येऊ नये. तसेच महागाई भत्त्यापोटी येणा-या खर्चाची माहिती या संचालनालयांस तात्काळ सादर करण्यांत यावी.

(डॉ.मु.का.महाजन)
प्र/संचालक,
तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

D.A. CIRCULAR 2009

**असुधारीत वेतनश्रेणीत वेतन घेणाऱ्या राज्य शासकीय व इतर पात्र कर्मचाऱ्यांना दिनांक १ जानेवारी, २००९ पासून महागाई भत्ता वाढ मंजूर करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शुध्दिपत्रक, क्रमांक : मभवा-११०९/प्र.क्र.९६/सेवा-९
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :२४ सप्टेंबर ,२००९

पहा:- (१) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक :मभवा-११०९/प्र.क्र.९६/सेवा-९, दिनांक २१ जुलै, २००९.

## शुध्दिपत्रक

उपरोक्त संदर्भाधीन शासन निर्णयातील परिच्छेद ४ खालीलप्रमाणे वाचण्यात यावा :-

२. शासकीय कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय असलेल्या महागाई भत्त्यामुळे येणारा खर्च, हा त्यांचे वेतन व भत्ते यासंबंधीचा खर्च ज्या लेखा शीर्षाखाली खर्ची घालण्यात येतो, त्याच लेखा शीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा. अनुदानप्राप्त संस्था, नगरपरिषदा व जिल्हा परिषदा यांच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत, संबंधित प्रमुख लेखा शीर्षाखालील ज्या उप लेखा शीर्षाखाली त्यांच्या सहायक अनुदानाबाबतचा खर्च खर्ची घालण्यात येतो, त्या उप लेखा शीर्षाखाली हा खर्च खर्ची घालण्यात यावा.

३. सदर शासन शुध्दिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २००९०९२३१८४०१६००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शि. म. म्हात्रे )
शासनाचे उप सचिव

प्रति,
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक
,जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जिल्हा अहमदनगर.
जिल्हा लेखा परीक्षा अधिकारी, स्थानिक निधी हिशेब, कोकण कृषि विद्यापीठ, दापोली, जिल्हा रत्नागिरी.